**ठळक बातम्या**

- राज्यस्तरीय आदिवासी सांस्कृतिक महोत्सवाचं मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत उद्घाटन

- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी गुजरात दौऱ्यावर; ९ हजार ७०० कोटी रुपयांपेक्षा जास्त खर्चाच्या विकास योजनांचं भूमिपूजन आणि उद्घाटन करणार

- बिहार विधानसभा निवडणुकीत राष्ट्रीय लोकशाही आघाडी प्रचंड बहुमताने विजयी, ८९ जागा जिंकत भाजपा ठरला सर्वात मोठा पक्ष

**आणि**

- शिल्पकार राम सुतार यांना 'महाराष्ट्र भूषण' पुरस्कार प्रदान

**<><><><>**

आदिवासी संस्कृती जपण्यासाठी सरकारनं अनेक योजनांची प्रभावी अंमलबजावणी सुरू केली आहे आणि अनेक नव्या योजना आखल्या जात असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज नागपुरात  दिली. स्वातंत्र्यसेनानी बिरसा मुंडा यांच्या जयंतीचं औचित्य साधून आयोजित राज्यस्तरीय आदिवासी सांस्कृतिक महोत्सवाच्या उद्घाटन समारंभात ते  बोलत होते.

**- - होल्ड मुख्यमंत्री - -**

महाराष्ट्रात एक कोटी २५ लाख आदिवासी असून १६ जिल्ह्यात त्यांच्या ४५ जमाती आहेत, अशी माहिती त्यांनी दिली. आदिवासींना जल, जमीन आणि जंगलापासून न तोडता त्यांना संरक्षण देण्यासाठी सरकार प्रयत्नशील असल्याचं ते म्हणाले. आदिवासी नायकांना शोधून त्यांचा इतिहास जगासमोर आणण्यासाठीही सरकारनं प्रयत्न केल्याचं त्यांनी सांगितलं. केंद्रीय रस्ते, परिवहन आणि राष्ट्रीय महामार्ग मंत्री नितीन गडकरी यावेळी उपस्थित होते. त्यांनी सरकार आदिवासींच्या प्रगतीसाठी सरकार करत असलेल्या उपाययोजनांचा आढावा घेतला.

दरम्यान, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी 'श्रीमती अनसूयाबाई काळे स्मृती सदना'चं आणि पूर्व विदर्भ महिला परिषदेच्या 'नोकरी करणाऱ्या महिला आणि मुलींच्या वसतीगृहा'चं उदघाटन केलं.

<><><><>

स्वातंत्र्य सेनानी भगवान बिरसा मुंडा यांच्या स्मृतीला अभिवादन करण्यासाठी देशभरात आज आदिवासी गौरव दिवस साजरा होत आहे. आजचा दिवस आदिवासी संस्कृतीच्या गौरवशाली इतिहासाचं महत्व अधोरेखित करतो. या निमित्तानं देशभर विविध सांस्कृतिक कार्यक्रम, प्रदर्शनं आणि शैक्षणिक उपक्रम आयोजित करण्यात आले आहेत. यंदा बिरसा मुंडा यांची १५० वी जयंती आहे.

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, उपराष्ट्रपती सीपी राधाकृष्णन, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि गृहमंत्री अमित शाह यांनी भगवान बिरसा मुंडा यांना आदरांजली वाहिली आहे.

नवी मुंबई महानगरपालिका मुख्यालयात आज बिरसा मुंडा यांना जयंतीनिमित्त अभिवादन करण्यात आलं. यावेळी महापालिका अधिकारी, कर्मचारी आणि नागरिक उपस्थित होते.

<><><><>

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आज गुजरात दौऱ्यावर आहेत. स्वातंत्र्य सैनिक आणि आदिवासी समुदायाचे नेते भगवान बिरसा मुंडा यांच्या शतकोत्तर सुवर्णमहोत्सवी जयंतीनिमित्त आज आदिवासी गौरव दिवस साजरा होत आहे. यानिमित्ताने नर्मदा जिल्ह्यातल्या देडियापाडा इथं एका कार्यक्रमात प्रधानमंत्री मोदी सहभागी होणार आहेत. ते ९ हजार ७०० कोटी रुपयांहून अधिकच्या विकास योजनांचं भूमिपूजन आणि उद्घाटन करणार आहेत. या विकास योजनांच्या माध्यमातून या भागातल्या आदिवासी समाजाचा विकास आणि पायाभूत सुविधांमध्ये सुधारणा केल्या जाणार आहेत.

प्रधानमंत्री जनजाती आदिवासी न्याय महा अभियान आणि धरती आबा जनजातीय ग्राम उत्कर्ष अभियानाअंतर्गत बांधलेल्या एक लाख घरांच्या गृहप्रवेश कार्यक्रमातही प्रधानमंत्री सहभागी होणार आहेत. आदिवासी भागात ७४८ किलोमीटरच्या नव्या रस्त्यांच्या कामांचं भूमिपूजनही मोदी करणार आहेत.

मोदी यांनी नर्मदा जिल्ह्यातल्या देवमोगरा मंदिरात दर्शन घेतलं. त्याआधी त्यांनी आज सकाळी सुरत इथं मुंबई-अहमदाबाद हायस्पीड रेल कॉरिडॉरच्या बुलेट ट्रेन स्थानकाच्या कामाची पाहणी केली.

**<><><><>**

पुणे इथल्या जमीन गैरव्यवहार प्रकरणात सरकार दिशाभूल करत असल्याची टीका काँग्रेस विधिमंडळ पक्षाचे नेते विजय वडेट्टीवार यांनी केली आहे. ते आज नागपूर इथं बोलत होते. पार्थ पवार यांच्या कंपनीने केलेल्या व्यवहाराची निःपक्षपातीपणे चौकशी व्हावी यासाठी आपण मुख्यमंत्र्यांना पत्र लिहिलं होतं, असं वडेट्टीवार म्हणाले. वतनाच्या जमीन खरेदीत जिल्हाधिकाऱ्यापासून ते खालच्या अधिकाऱ्यांच्या संगनमताने व्यवहार झाला आहे. त्यामुळे जे अधिकारी सहभागी होते, त्यांच्यावर कारवाई झाली पाहिजे. उच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांच्या अध्यक्षतेखाली या प्रकरणाची चौकशी व्हावी अशी मागणी आपण या पत्रातून केल्याचंही वडेट्टीवार म्हणाले.

**<><><><>**

मतदारयाद्यांच्या सखोल पुनरीक्षणाचा दुसरा टप्पा सुरू झाल्यापासून ४६ कोटी गणना अर्ज वाटप झाल्याचं निवडणूक आयोगाने सांगितलं. उत्तरप्रदेशात सर्वाधिक १३ कोटी ७४ लाख अर्जांचं वाटप झालं आहे. तर पश्चिम बंगालमधे ७ कोटी ४ लाख गणना अर्ज वाटण्यात आले आहेत. या टप्प्यात ९ राज्यं आणि तीन केंद्रशासित प्रदेशांमधे मतदार याद्यांचं सखोल पुनरीक्षण होणार आहे.

**<><><><>**

बिहार विधानसभा निवडणुकीत भाजपाप्रणित राष्ट्रीय लोकशाही आघाडीने २४३ जागांपैकी २०२ जागा जिंकत प्रचंड बहुमत मिळवलं आहे. यामुळे राष्ट्रीय लोकशाही आघाडीच बिहारमधे सरकार स्थापन करणार हे काल जाहीर झालेल्या निकालात स्पष्ट झालं. सरकार स्थापन करण्यासाठी १२२ जागांची आवश्यकता आहे, त्या तुलनेत रालोआचा हा विजय ऐतिहासिक मानला जात आहे. ८९ जागा जिंकत भाजपा बिहार विधानसभेतला सर्वात मोठा पक्ष ठरला आहे. तर संयुक्त जनता दल ८५, लोकजनशक्ती पार्टी रामविलास १९, हिंदुस्तान आवामी मोर्चा ५, राष्ट्रीय लोक मोर्चा ४ जागांवर विजयी झाले. विरोधी पक्षांच्या महाआघाडीला केवळ ३५ जागा मिळाल्या. यात राजद २५, काँग्रेस

६, भाकप माले २, माकपला एका जागेवर यश आलं. एमआयएम पक्षाने पाच जागा जिंकत पुन्हा एकदा बिहारमधे आपली राजकीय ताकद दाखवून दिली आहे. प्रशांत किशोर यांच्या जनसुराज पक्षाला एकाही जागेवर विजय मिळवता आला नाही. ६ आणि ११ नोव्हेंबरला दोन टप्प्यात झालेल्या बिहार विधानसभा निवडणुकीत ६९ पूर्णांक १३ शतांश टक्के इतकं मतदान झालं.

बिहार विधानसभा निवडणुकीत रालोआचा विजय नवी दिल्लीतल्या भाजपा मुख्यालयात साजरा झाला. बिहारी जनतेनं पुन्हा एकदा विकसित बिहारसाठी, समृद्ध बिहारसाठी मतदान केल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यावेळी म्हणाले.

देशातल्या सात राज्यांमधल्या आठ विधानसभा पोटनिवडणुकीचे निकालही काल जाहीर झाले. यात भाजपा आणि काँग्रेस यांना प्रत्येकी दोन जागांवर विजय मिळाला. आम आदमी पार्टी, झारखंड मुक्ती मोर्चा, मिझो नॅशनल फ्रंट आणि पीपल्स डेमोक्रॅटिक पार्टीला प्रत्येकी एक जागा मिळाली.

**<><><><>**

विख्यात शिल्पकार राम सुतार यांनी घडवलेली शिल्पं इतिहासाची साक्षीदार असून त्यातून अभिव्यक्त होणारा वारसा शेकडो वर्षं अबाधित राहील अशा शब्दांत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राम सुतार यांचा गौरव केला. सुतार यांना महाराष्ट्र सरकारचा सर्वोच्च नागरी सन्मान असणारा ‘महाराष्ट्र भूषण’ पुरस्कार काल मुख्यमंत्र्यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला, त्यावेळी ते बोलत होते. उत्तर प्रदेशात नोएडा इथं सुतार यांच्या निवासस्थानी झालेल्या या अनौपचारिक कार्यक्रमाला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, सांस्कृतिक कार्य मंत्री आशिष शेलार आणि अन्य मान्यवर उपस्थित होते. राम सुतार यांनी आपल्या शिल्पांच्या माध्यमातून महाराष्ट्रासह देशाचा नावलौकिक जगभरात वाढवला आहे. त्यांच्यामुळे महाराष्ट्र भूषण पुरस्काराची उंची वाढली असल्याचं मुख्यमंत्री म्हणाले.

**<><><><>**

विठ्ठल उमप फाऊंडेशनचा ‘मृदगंध पुरस्कार’ गझलनवाझ भीमराव पांचाळे यांना जाहीर झाला आहे. शाहीर विठ्ठल उमप यांच्या १५व्या स्मृतीदिनानिमित्त १५वा लोकशाहीर विठ्ठल उमप स्मृती संगीत समारंभ २६ नोव्हेंबरला मुंबईत होत आहे. त्यात पांचाळे यांना हा

पुरस्कार दिला जाईल. शाहीर राजेंद्र राऊत, प्रदीप शिंदे, अभिनेते जयवंत वाडकर, परेश मोकाशी, मधुगंधा कुलकर्णी, अभिनेत्री रिंकू राजगुरू हेही यंदाच्या मृदगंध पुरस्काराचे मानकरी आहेत.

**<><><>**

नवी मुंबईत तळोजा तसंच कळंबोली या परिसरातून अंमली पदार्थ विरोधी पथकाने काल एक कोटी सतरा लाख रुपये किमतीचे अंमली पदार्थ जप्त केले. या प्रकरणात दोन जणांना अटक करण्यात आली. त्यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपींना अंमली पदार्थांचा पुरवठा करणाऱ्या अन्य पाच जणांचा पोलीस शोध घेत आहेत.

**<><><>**

भंडारा इथं लाखांदूर तालुक्यात प्राथमिक आरोग्य केंद्राच्या गेटसमोर असलेल्या पान ठेल्यावर काल संध्याकाळी एका खासगी गाडीची धडक बसल्याने तीन जण जखमी झाले. यातील एक जण गंभीर जखमी असून त्याला तातडीने सामान्य रुग्णालय भंडारा येथे हलविण्यात आलं. तर इतर दोघं किरकोळ जखमी असून त्यांच्यावर बारव्हा प्राथमिक आरोग्य केंद्रात उपचार सुरू आहेत.

**<><><>**

मुंबई आय आय टी अर्थात भारतीय तंत्रज्ञान संस्थेने येत्या २२ आणि २३ तारखेला मुंबई आय आय टी च्या प्रांगणात दुसऱ्या राष्ट्रीय आरोग्य परिषदेचं आयोजन केलं आहे. मानसिक आरोग्यावर उपाययोजनांसाठी एकात्मिक दृष्टिकोन ही या परिषदेची मुख्य संकल्पना आहे. या परिषदेत शिक्षण क्षेत्रातील तज्ञही सहभागी होणार आहेत.

**<><><>**

बीड जिल्ह्यात जनावरांमध्ये ‘लंपी’ या त्वचारोगामुळे आतापर्यंत ५८ जनावरं दगावली असून, जिल्ह्याच्या विविध भागांत ९०० जनावरांना त्याचा संसर्ग झाला आहे. याची दखल घेऊन, शासनानं प्रतिबंधात्मक उपाययोजना कराव्यात आणि शेतकऱ्यांना नुकसान भरपाई द्यावी अशी मागणी खासदार बजरंग सोनावणे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना लिहिलेल्या पत्रात केली आहे.

**<><><>**

कोलकात्यात इडन गार्डन इथं सुरु असलेल्या पहिल्या कसोटी क्रिकेट सामन्याच्या दुसऱ्या दिवशी आज भारतानं दक्षिण आफ्रिकेवर पहिल्या डावात ४० धावांची नाममात्र आघाडी घेतली आहे. भारतानं काल दक्षिण आफ्रिकेचा पहिला डाव १५९ धावात गुंडाळल्यावर भारतीय संघालाही केवळ १८९ धावांपर्यंतच मजल मारता आली. भारतातर्फे के एल राहुल आणि वॉशिंग्टन सुंदर यांनी दुसऱ्या गड्यासाठी केलेली ५७ धावांची भागीदारी वगळता भारताचे इतर फलंदाज ठराविक अंतरानं बाद होत गेले. भारताचा कर्णधार शुभमन गिलला दुखापतीमुळे ४ धावांवर माघारी परतावं लागलं. त्यानंतर दुसऱ्या डावाचं शेवटचं वृत्त हाती आलं तेव्हा दक्षिण आफ्रिकेच्या २ बाद २५ धावा झाल्या होत्या.

**<><><><>**

मुंबईसह महाराष्ट्रात गेले काही दिवस पहाटे आणि रात्रीच्या तापमानात घट दिसून येत आहे. वातावरणातला उष्मा कमी झाल्यामुळे मुंबईकरांना थोडा दिलासा मिळाला आहे.

**//<><><><>//**